नेहमी सकारात्मक राहा, कारण सकारात्मक विचारच तुम्हाला यश मिळवून देऊ शकतात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार १८ मार्च २०२५ | अंक ९८० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# औरंगजेबच्या कबरीवरुन नागपुरात जमाव आक्रमक; जाळपोळ, दगडफेक, मुख्यमंत्र्यांकडून शांततेच आवाहन


## नेमकं काय घडलं?

औरंगजेबच्या कबरीवरून नागपुरात चांगलाच वाद पेटला आहे. दोन गट आमने-सामने आले. नागपुरच्या महाल परिसरात जोरदार राडा झाला. काही कळायच्या आतच दगडफेक सुरू करण्यात आली, या घटनेत पोलीस जखमी झाले आहेत. वाहनांचं प्रचंड प्रमाणात नुकसान झालं आहे. वाहनांच्या काचा

फुटल्या आहेत. पोलिसांकडून जमाव पांगवण्याचा प्रयत्न सुरू आहे. जमाव पांगवण्यासाठी पोलिसांकडून अश्रुधुराचा मारा देखील करण्यात आला. मात्र जमाव अधिकच आक्रमक झाल्यानं जाळपोळीच्या घटना देखील घडल्या आहेत. दरम्यान या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांततेच आवाहन केलं आहे. लोकांनी पोलिसांना सहकार्य करावं, प्रशासन परिस्थिती हाताळत आहे, असं त्यांनी यावेळी म्हटलं आहे. या परिसरात सध्या दहशतीचं वातावरण निर्माण झालं आहे.



नागपूरमधून मोठी बातमी समोर येत आहे. औरंगजेबच्या कबरीवरून आता वाद चांगलाच पेटला आहे. नागपुरात दोन गटामध्ये तुफान हाणामारी झाली. नागपूरच्या महाल परिसरात औरंगजेबाच्या कबरीवरून राडा झाला आहे. दोन गट आमने-सामने आल्याचं पाहायला मिळालं. वाद टोकाला पोहोचला आणि दोन्ही गटामध्ये दगडफेक सुरू झाली. दगडफेकीत पोलीस जखमी झाले आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी



पोलिसांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. दोन्ही गटांनी केलेल्या दगडफेकीत अनेक वाहनांचं मोठं नुकसान झालं, आहे, दरम्यान या घटनेनंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शांततेच आवाहन केलं आहे.

## नेमकं काय म्हणाले फडणवीस?

नागपुरातील महाल परिसरात दगडफेक आणि तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्यावर पोलीस प्रशासन परिस्थिती हाताळत आहे. या परिस्थितीमध्ये नागरिकांनी प्रशासनाला संपूर्ण सहकार्य करावे, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. आपण सातत्याने पोलीस प्रशासनाशी संपर्कात असून त्यांना नागरिकांनी सहकार्य करावे. नागपूर हे शांतताप्रिय आणि एकमेकांच्या सुखदुखःत सहभागी होणारे शहर आहे. अशावेळी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नका, आणि प्रशासनाला सहकार्य करा, असंही यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# मराठा आरक्षणासाठी आणखी एक बळी, आरक्षण मिळत नसल्याने युवकाने शेतात गळफास घेवून संपवले जीवन

मराठा समाजास आरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरु केले आहे. या आंदोलनात कोणत्याही युवकाने टोकाचे पाऊल उचलू नये, असे आवाहन मनोज जरांगे पाटील वारंवार करत आहे. त्यानंतर आरक्षणाच्या मागणीसाठी टोकाचे पाऊल उचलले जात आहे. आता धाराशिवच्या कळंब तालुक्यातील देवळाली गावात २६ वर्षीय तरुणाने शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. मराठा सामाजास आरक्षण मिळत नसल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे कुटुंबियांनी सांगितले. योगेश संजय लोमटे असे त्या तरुणाचे नाव आहे.

चिठ्ठीत लिहिले जीवन संपवण्याचे कारण

योगेश संजय लोमटे यांनी गावातील शेतात जावून गळफास घेतला. त्यांच्या खिशात चिठ्ठी सापडली आहे. त्यात चिठ्ठीत मराठा आरक्षणासाठी आत्महत्या करत असल्याचा मजकुर लिहिला आहे. योगेश लोमटे हे उच्चशिक्षित आहेत. गेल्या काही वर्षांपासून ते नोकरीसाठी प्रयत्न करत होते. परंतु मराठा समाजास आरक्षण नसल्याने नोकरी मिळत नसल्याने ते नैराश्यात आले. त्यामुळे त्यांनी आत्महत्या केल्याचे कुटुंबियांनी सांगितले. पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहे. पोलिसांनी पंचनामा सुरु केला आहे. मराठा आरक्षणाचा विषय सुटत नसल्यामुळे तरुण नैराश्यात येत आहे. गेली अनेक वर्षांपासून





मराठा आरक्षणासाठी आंदोलन सुरु आहे. यापूर्वी मराठा समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही. त्यामुळे मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली आहे मागील आठवड्यात मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी मुंबईत आंदोलन करण्याचे संकेत दिले होते. आता यापुढे कमी सांगायचे आणि कमी बोलायचे पण आता करून दाखवायचे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले होते. आपण आपली चाल आता उघड करणार नाही, असे त्यांनी म्हटले होते. आता धारशिव जिल्ह्यातील तरुणाने आरक्षणासाठी जीवन संपवल्यानंतर मनोज जरांगे आणखी आक्रमक होणार

# मंडळ अधिकाऱ्याकडून फेरफाराची माहिती देण्यास टाळाटाळ

## तिपटे यांची तहसिलदार यांच्याकडे तक्रार

बीड, : नवगण राजुरी मंडळ विभागात किती फेरफार मंजूर आणि किती नामंजूर झाले आहेत, याबाबतची माहिती देण्यात यावी अशी मागणी भगवान तिपटे यांनी माहिती अधिकाराच्या खाली मंडळ अधिकाऱ्याकडे मागितली. मात्र, ते माहिती देण्यास टाळाटाळ करत असून याबाबत तहसिलदार यांच्याकडे तक्रार करण्यात आली. तहसिलदारांनी या प्रकरणाची दखल घ्यावी अशी मागणी करण्यात आली. तिप्पटवाडी ता. बीड येथील भगवान यशवंता तिपटे यांनी नवगण राजुरीचे मंडळ अधिकारी येवले यांच्याकडे फेरफार मंजुरी आणि नामंजुरीची माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागवली होती. मात्र, त्यांनी याबाबत कसलेही उत्तर दिलेले नाही. त्यामुळे तिपटे यांनी मंडळ अधिकारी यांची तहसिलदार यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. तहसिलदारांनी याबाबत दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

# गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार

## जलयुक्त शिवार योजनेतंर्गत शेतीची सुपिकता वाढवण्यात येणार

: राज्यात जलयुक्त शिवार योजनेचा दुसरा टप्पा राबवण्यात येत आहे. या अंतर्गत धरणातील गाळ काढून तो जमिनीमध्ये टाकण्यात येणार आहे. त्याचे दोन फायदे आहेत. पहिला गाळ काढल्यामुळे धरणाची साठवण क्षमता वाढणार आणि दुसरा फायदा शेतीची सुपिकता चांगली होणार आहे. धरणातील गाळ काढण्यासाठी सामाजिक संस्थांची देखील मदत घेतली जाणार आहे. राज्यातील अनेक तलावे हे रिकामे झालेले आहे. तर काही तलावातील पाणी साठा कमी झाला. जो तलाव कोरडा पडलेला आहे. त्या तलावातील गाळ काढण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांनी जलयुक्त शिवार योजनेचा दुसरा टप्पा जाहीर केलेला आहे. या योजनेचा पहिला टप्पा यापुर्वीच पूर्ण करण्यात आलेला होता. दुसऱ्या टप्प्यात सामाजिक



संस्थांच्या सहभागातून धरणातील गाळ काढून तो जमिनीमध्ये टाकण्यात येणार आहे. याचे दोन फायदे होणार आहे. पहिला फायदा धरणातील गाळ काढल्याने धरणातील पाणी साठ्यात वाढ होणार, दुसरा फायदा जमिनीची सुपिकता वाढणार आहे. राज्यातील अनेक धरणे कोरडे पडलेले आहेत. तर काही धरणातील पाणी साठा ४० टक्क्यांपर्यंत आलेला आहे. ज्या धरणात पाणी नाही अशा धरणातील गाळ काढण्याचे काम केले जाणार आहे. दरम्यान, गेल्या २ वर्षात दिड हजारापेक्षा जलश्रोत्रातून साडेचार कोटी घनमिटर गाळ काढण्यात आलेला आहे. सुमारे ४० हजार शेतकऱ्यांनी हा गाळ आपल्या शेतात टाकला. ३४ जिल्ह्यामध्ये ९ कोटी घनमिटर गाळ उपसण्याची क्षमता असून १.८ लाखांहून अधिक शेतकरी गाळ वाहून नेणार आहेत. बीड जिल्ह्यातीलही अनेक धरणे रिकामी झाले आहेत. ज्या ज्या शेतकऱ्यांना गाळ हवा आहे, त्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये गाळ टाकता येणार आहे. आपल्या जमिनीची सुपिकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घ्यायला हवा, कारण गाळासाठी पैसे लागणार नाहीत.

# अंबाजोगाईत व्याजाच्या पैशांसाठी अपहरण करून तरुणाला अमानुष मारहाण

अंबाजोगाई : शहरातील हनुमान नगर येथे राहणाऱ्या ओंकार माने (वय २२) या तरुणाला व्याजाच्या पैशांसाठी अपहरण करून अमानुष मारहाण करण्यात आली. सदर घटना १४ मार्च रोजी रात्री घडली असून, याबाबत अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ओंकार माने याच्या फिर्यादीनुसार, त्याने मित्राकडून वीस हजार रुपये उसने घेतले होते. हे पैसे परत करण्यासाठी रक्कम शिल्लक नसल्याची अडचण त्याने अनिकेत औताडे यास बोलून दाखवली. तेंव्हा अनिकेतने माझा भाऊ जयपाल उर्फ महादू औताडे हा व्याजाने पैसे देतो, तू तुझ्यासाठी २० हजार आणि माझ्यासाठी ५० हजार अशी रक्कम घे, मी माझी रक्कम आणि व्याज फेडतो असे ओंकारला सांगितले. त्याच्यावर विश्वास ठेऊन ओंकारने महादू कडून याच्याकडून ७० हजार रुपये व्याजाने घेतले. मात्र, सात टक्के दराने घेतलेल्या या कर्जावर सतत स्वतःचे आणि अनिकेतचे व्याज भरावे लागत असल्याने ओंकार आर्थिक अडचणीत सापडला. यापुढे तुझे पैसे भरणे शक्य नसल्याचे त्याने अनिकेत याला सांगितले असता, त्याने आपल्या साथीदारांसह ओंकारला धमकावत जबरदस्तीने कारमधून उचलून नेले. त्यानंतर ओंकारला सेलू आंबा येथील एका ढाब्याच्या मागील शेतात नेण्यात आले. तेथे महादु औताडे व त्याच्या साथीदारांनी लोखंडी रॉड, केबल वायर आणि फायबर पाईपने ओंकारला बेदम मारहाण केली. तसेच, व्याजाचे पैसे भर नाहीतर तुला फासावर लटकवू अशी धमकी दिली. यावेळी, एका स्थानिक व्यक्तीने हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्यालाही धमकावले.

# पाथर्डीत तरुणाला अमानुष मारहान

## मारहाणीत लोखंडी रॉड दगडाचा वापर करत शूटिंग केली; गुन्हा दाखल केल्यास आरोपीकडून जीवे मारण्याची धमकी; तडीपार आरोपीचा गुन्हयात सहभाग

पाथर्डी धुलीवंदनाच्या दिवशी एका पंचवीशीतल्या तरुणांला तडीपार गँगने घरातून उचलून नेवून वनदेवाच्या डोंगरात लोखंडी रॉड, दगड व लाथा बुक्याने बेदम मारहान केली. मारहानीत सराफाच्या तरुणाचा हात फ्रैक्चर झाला असून शहरातील एका खाजगी हॉस्पीटलमध्ये त्याच्यावर शस्त्रक्रीया केली आहे. आरोपींनी पुन्हा थेट खाजगी हॉस्पीटलमध्ये जावून मारहान केलेल्या तरुणाला पोलीसात गुन्हा दाखल केला तर तुला जिवे मारु अशी धमकी दिली. त्यामुळे आज तिसऱ्या दिवशीही पाथर्डी पोलीसात कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. पोलीसांनी अत्याचार ग्रस्त तरुणाला आधार देवून सुमोटो फिर्याद दाखल करावी अशी मागणी शहरातील नागरीकाकडून केली जात आहे. मस्साजोग, शिररुच्या घटनेनंतर पाथर्डीत देखील अशा कूर व निर्दयी घटना नियमीतपणे घडू लागल्याने संपुर्ण तालुक्यात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. मागील काही वर्षापासून पाथर्डीत मस्साजोग, व शिरुरुच्या घटनासारख्या घटना घडत होत्या. मस्साजोग व शिरुरच्या घटनेवर माध्यमे व लोकप्रतिनिधींनी यावर प्रकाश टाकल्याने राज्याचे लक्ष अशा घटनाकडे वेधले गेले. अवैध सावकारकी, जमिनीचा बेकायदेशीर ताबा, मारहान, राजकीय दबावातून दमदाटी, मारहान, हनीट्र ॅप, अॅट्रॉसीटी, छेडछाड, विनयभंग, असे गुन्हे दाखल करण्याची भिती दाखवून अन्याय व अत्याचाराच्या घटना पाथर्डीत गेल्या काही वर्षापासून घडत आहेत. पाथर्डी शहर व तालुक्यातील गुन्हेगारांनी अनेकांना अमानुष मारहान केलेल्या आहेत. मात्र फिर्याद दाखल केली तर हे सराईत गुन्हेगार आपल्याला पुन्हा मारहान करतील. पोलीस संरक्षणावर नागरीकांचा व बळी पडलेल्या अत्याचार ग्रस्ताचा विश्वास नाही. त्यातूनच असे गुन्हे वारंवार घडत आहेत. सराफाच्या तरुणाला मारहानीच्या या घटनेत समजलेली माहीती अशी की, धुलीवंदनाच्या दिवशी तडीपार गँग च्या गुन्हेगारी वृत्तीच्या गु ंडानी गाडी वापरण्यासाठी मागणी केली. या तरुणाने गाडी देण्यास नकार दिल्याने किरकोळ बाचाबाची झाली. त्यानंतर पुन्हा या सराफाच्या तरुणाला शहरातील रहात्या घरातून उचलून नेवून धामनगांव रोडला असलेल्या वनविभागाच्या जंगलात नेवून लोखंडी रॉड, लाथा बुक्याने सहा ते आठ लोकांनी बेदम मारहान केली. त्यानंतर तेथून पुन्हा गायछाप जवळ नेवून पुन्हा मारहान केली. या मारहानीत सराफाच्या युवकाचा हात फ्रॅक्चर झाला असून, पाठीवर, पोटावर, छातीवर रॉडचे वळ आहेत. जखमा आहेत. या मारहानीत हात फ्रॅक्चर झाला असून हाताची शस्त्रक्रीया करण्यात आली आहे. अत्याचारग्रस्त जखमी युवकाने गुन्हा दाखल करु नये यासाठी रात्रीच्या सुमारास पुन्हा सराईत गुन्हेगार जमावाने खाजगी हॉस्पीटलमध्ये दाखल झाले. गटा गटाने बाहेर थांबले. जखमी तरुणांचे नातेवाईकांना बाहेर काढून दिले. व त्या तरुणाला पुन्हा जखमी अवस्थेत मारहान करण्यासाठी धावू लागले. डॉक्टराच्या कॅबीनमध्ये जावून धुडगूस घातला. डॉक्टरांच्या मध्यस्थीने या जमावाला बाहेर काढले. मारहान दमदाटी यामुळे अत्याचार ग्रस्त तरुण व त्याचे नातेवाईक पुर्णपणे घाबरले असून त्यांनी आरोपीच्या दहशतीने फिर्याद दाखल न करण्याचा निर्णय घेतला आहे. या बाबत अत्याचार ग्रस्त तरुणावर उपचार केलेल्या खाजगी डॉक्टरांनी पोलीसाकडे एम.एल.सी दाखल केलेनंतर पोलिस निरीक्षक संतोष मुटकूळे यांनी पोलीस उप निरीक्षक महादेव गुट्टे यांना हॉस्पीटल मध्ये जावून जखमी तरुणांची माहीती घेतली. विचारपूस केली. मात्र जखमी तरुणांच्या कुंटूबीय भेदरलेली असल्याने व आरोपी हे सराईत असून शहरात त्यांची दहशत व दादागीरी आहे. हे पुन्हा आम्हाला जिवे मारतील अशी भिती असल्याने गुन्हा दाखल करण्यास असमर्थता दर्शवली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १८ मार्च २०२५
https://lokaarambh.com




## संपादकीय

### बंधने फक्त महिलांवरच का ?

आज २१ व्या शतकात पुरुष आणि महिला असा कोणताच भेद राहिला नाही. आज महिलाही पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात अग्र`सर आहेत. असे कोणतेच क्षेत्र नाही जिथे महिला पुरुषांची बरोबरी करू शकत नाही. कला, क्रीडा, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, साहित्य अशा सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे मात्र समाजात आजही असा एक घटक आहे ज्यांना महिलांची ही प्रगती खटकत आहे. आजही तो घटक महिलांना केवळ चूल आणि मूल या पुरतच मर्यादित ठेवू इच्छितो म्हणूनच हे सनातनी विचारांचे प्रतिगामी लोक महिलांना सतत या ना त्या कारणांहून ट्रोल करत असतात. कधी ते महिलांच्या केशभूषे वरून ट्रोल करतात तर कधी ते महिलांना त्यांच्या वेशभूषेवरुन ट्रोल करतात. आजच्या मुली मुलांप्रमाणे कपडे` घालतात, जीन्स पॅन्ट टी शर्ट घालतात त्यांच्या जीन्स पॅन्ट गुडघ्यावर फाटलेल्या असतात याचा त्यांना राग येतो तर कधी मुलींच्या नटण्या मुरडण्याचा त्यांना राग येतो. महिलांना ट्रोल करण्यात समाजातील प्रतिष्ठित घटकही मागे नसतात. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात हे कसले संस्कार असे ? असा प्रश्न मध्यंतरी उत्तरांचलच्या मुख्यमंत्र्यांनी जाहीर सभेत विचारला होता. केवळ हेच महाशय नाही तर अनेकजण महिलांच्या वेशभूषेवरुन महिलांना टार्गेट करत असतात वास्तविक कोणी कोणते कपडे वापरायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. सार्वजनिक ठिकाणी गुडघ्यावर फाटलेली जीन्स पॅन्ट फक्त महिलाच घालतात का? पुरुषही फाटलेली जीन्स घालतात. बरमुडा किंवा शॉर्ट पॅन्ट घालून गावभर फिरतात पण त्यांच्या कपड्यावर कोणीच आक्षेप घेत नाही. म्हणजे पुरुषांनी कसलेही कपडे वापरले तरी चालेल मात्र महिलांना ते स्वातंत्र्य नाही. महिलांना मात्र त्यांच्या आवडीचे कपडे घालायला बंदी. मग प्रश्न येतो बंधने फक्त महिलांवरच का? महिलांनी कोणते कपडे घालावेत हे ठरवण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला? महिलांनी कोणते व कसे कपडे घालावेत, महिलांनी कोठे फिरावे, काय खावे, काय प्यावे हे पुरुषांनी ठरवावे ही तर अठराव्या शतकातील मानसिकता झाली. २१ व्या शतकातही महिलांना समान अधिकार मिळत नाही त्यांना त्यांच्या अधिकारासाठी झगडावे लागते ही दुर्दैवाची बाब आहे. स्त्री पुरुष समानता ही फक्त बोलण्यापूरतीच आहे हेच या मानसिकतेतून दिसून येते. जगात एकीकडे महिलांना समान अधिकार मिळावेत यासाठी चळवळ उभी केली जात आहे तर आपल्याकडे महिलांनी कसे राहायचे, तिने कोणते कपडे घालायचे, कसे कपडे घालायचे यावर चर्चा केली जाते. प्रश्न महिलांनी कसे आणि कोणते कपडे घालायचा हा नसून प्रश्न त्यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा आणि महिलांच्या मानवी हक्काचा आहे. हे हक्क कोणीही हिरावून घेऊ नये. महिला गुडघ्यावर फाटलेली जीन्स घालतात, तोकडे कपडे घालतात म्हणून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार होतात असा तर्क लढवला जातो. महिला संध्याकाळी बाहेर फिरायला जातात म्हणून त्यांच्यावर बलात्कार होतात असाही दावा तथाकथित संस्कृती रक्षक करतात पण ते सोयीस्करपणे हे विसरतात की आपल्या देशात अंगभर कपडे घातलेल्या साठ सत्तर वर्षाच्या वृद्धेवर देखील बलात्कार होतो. विकृत मानसिकता असलेले लोक अंगभर कपडे घातलेल्या महिलांकडे देखील विकृत नजरेने पाहतात. अंगभर कपडे असोत की तोकडे कपडे असोत ज्यांची मानसिकता विकृत आहे त्या नराधमांना महिला केवळ भोगवस्तू वाटते. महिलांच्या कपड्यांवर भाष्य करण्याऐवजी ही पुरुषी मानसिकता बदलली तर देशात महिला अत्याचाराच्या घटना घडणार नाह

# गजाल गाथण

## मालवणी कथांची मेजवानी




नुकताच गजाल गाथण हा मालवणी कथासंग्रह वाचून झाला. गाथण म्हणजे कोकणात मासे पकडताना झाडाच्या छोट्याश्या फांदीत पकडलेल्या माशांना गोवणे. हे गोवून झाल्यावर तयार होते ती गाथण. अशाच प्रकारे मालवणी कथांना लेखिका पूर्णिमा गावडे-मोरजकर यांनी मालवणी भाषेमध्ये गोवले आहे.

पूर्णिमा गावडे मोरजकर यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. ऊण्या प-्या १५ कथा या संग्रहात आहेत.या कथा वाचताना खूप खोलवर मालवणी स्वभावाचे दर्शन देऊन जातात. भाषा ही दर बारा कोसावर बदलत जाते असे म्हणतात. तशाच प्रकारे मालवणी भाषा सुद्धा बदलत जाते. मालवण कडची, देवगड कडची, वेंगुर्ल्या कडची तशीच बांद्याकडची मालवणी सुद्धा थोडी वेगळी वेगळी जाणवते. लेखिकेचा गाव हा गोव्याच्या सीमेलगत आहे. त्यामुळे मालवणी भाषेत कोंकणी शब्द हातात हात घालून खेळत रहातात. पुस्तकाची प्रस्तावना जागतिक दर्जाचे इंग्रजी नाटककार आणि कवी अनिल सरमाळकर यांनी लिहिली आहे.

कथा वाचताना आपणही नॉस्टॅल्जिक होऊन जातो. ज्यांनी गावपण जगलं आहे त्यांच्यासाठी हा कथासंग्रह पर्वणीचा आहे. एक एक कथा वाचताना आपणही आपल्या भूतकाळात शिरत जातो. नाळ ही कथा वाचताना आपण लहान असताना आपल्या गोठ्यातली गुरे आठवू लागतो. लहानपणी त्यांना चरायला घेऊन जाणे, लहान पाडसांबरोबर खेळणे,गायीच्या धारा काढणे, गुरांना गवत घालणे अशा गोष्टी आपसूक आठवू लागतात. शेवटची घटका ही कथा वाचताना गावातील वृद्ध मंडळी आपल्या डोळ्यासमोर उभी रहतात. मनाटकाची गजालफ वाचताना दशावतार नाटक आठवू लागतो. प्रत्येक कथा वाचताना त्याच्याशी निगडित गोष्टी आपोआप आठवत रहतात. संपूर्ण कथासंग्रह मालवणी भाषेत असल्याने अनेक शब्दांची पुन्हा नव्याने ओळख झाल्यासारखे वाटू लागते. अनेक कथां मधून मालवणी माणसांच्या स्वभावाचे दर्शन होत रहाते. मालवणी गजाल ही तशी छोटीशीच असते पण खूप काही शिकवून जाते. खूप आनंद देऊन जाते. मालवणी माणसाच्या स्वभावाचे दर्शन देऊन जाते. गजाली हा शब्द मुळी मालवणी माणसाच्या परवलीचा शब्द आहे. मालवणी माणसाचा दिवस गजालीं शिवाय पूर्णच होऊ शकत नाही. एवढे अनन्यसाधारण महत्त्व या गजालींना आहे. पूर्णिमा गावडे मोरजकर यांनी या गजालींना शब्दबद्ध करून मालवणी माणसांसमोर सादर केल्या त्यामुळे त्यांनी मालवणी साहित्यात मोलाची भर टाकली आहे. त्या गजालींचा आस्वाद तर घ्यावाच लागेल. प्रत्येक मालवणी माणसाने या गजाली वाचायलाच हव्यात.

जयेश अर्जुन माधव

**पुस्तक: गजाल गाथण**
**लेखिका: पूर्णिमा गावडे-मोरजकर**
**किंमत: १५०/-**

## छावा चित्रपट पाहून जिल्हा परिषदेची मुले भारावली

पिंपिश : जिल्हा प्राथमिक शाळा ठाकरवाडी (ता. हवेली) येथील विद्यार्थ्यांना शनिवारी ङ्गछावाफ चित्रपट दाखविण्यात आला. हा चित्रपट पाहून विद्यार्थी अक्षरशः भारावले. चित्रपट संपल्यानंतर या विद्यार्थ्यांनी चित्रपटगृहात ङ्गहर हर महादेवफ, ङ्गछत्रपती संभाजी महाराज की जयफ, मजय भवानीफ आदी घोषणाही दिल्या. विद्यार्थ्यांनी दिलेल्या या घोषणांना चित्रपट गृहातील उपस्थितांनीही प्रतिसाद दिला.नवज्योत मित्र मंडळ यरवडा व युगंधर मित्र मंडळ सनसिटी रस्ता या दोन मंडळांनी या विद्यार्थ्यांना सिंहगड रस्त्यावरील फन टाईम चित्रपटगृहात चित्रपट दाखविला. तसेच चित्रपटाच्या प्रारंभी आणि चित्रपट संपल्यानंतर या मंडळांकडून



विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या खाऊचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखविण्यासाठी बुधवार पेठेतील साईनाथ मित्र मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियुष शहा यांनी पुढाकार घेतला होता. चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून हा चित्रपट पाहण्याची विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे चित्रपटाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रचंड उत्सुकता होती. चित्रपट संपल्यानंतर चांगला चित्रपट पाहिल्याचा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेर्हयावर झळकत होता.या उपक्रमासाठी केंद्र प्रमुख मोहन भालचिम, केंद्र समन्वयक किशोर भवाळकर यांनी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थ्यांसह शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक मनिषा बुंदे, नवज्योत मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित जाधव, युगंधर मित्र मंडळाचे अध्यक्ष मयुर पोटे, फन टाईम चित्रपटगृहाचे व्यवस्थापक संदिप कांबळे, श्वेता जाधव, समर्थ जाधव, रवींद्र पायगुडे, सुवर्णा पायगुडे, दिपाली पारगे, अलका पारगे आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ नागरिक संघ नेरुळ संस्थेचा जागतिक महिला दिन उत्साहात साजरा.

नवी मुंबई ( सुभाष हांडे देशमुख )

नवी मुंबई : नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक संघ संस्थेचा जागतिक महिला दिन सोहळा गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या श्री गणेश सभागृहात मोठ्या उत्साहात साजरा झाला. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले राज्य सरकार पुरस्कार विजेत्या श्रीमती फुलन ज्योतिराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या डॉक्टर श्रीमती वृषाली मगदूम, साहित्यिक श्रीमती सुनंदा भोसेकर, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरविंद वाळवेकर आदी मान्यवर विचार मंचावर उपस्थित होते. जेष्ठ नागरिकांनीही उत्स्फ ूर्तपणे उपस्थित राहून सहभाग दर्शविला. प्रसंगी विविध क्षेत्रात योगदान दिलेल्या महिलांचा हिरकणी पुरस्कार - २०२५ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दीप प्रज्वलन आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करुन सुरू झालेल्या या कार्यक्रमात श्रीमती अपर्णा दाबके ताई यांच्या सहका-ांनी स्वागत गीत व प्रार्थना म्हटली. त्याचप्रमाणे नंदलाल बॅनर्जी यांच्या शंखनादाने वातावरण अधिक मंगलमय झाले. आपल्या प्रास्तविक भाषणात अरविंद वाळेकर यांनी महिलांच्या चळवळीला ५० वर्ष झालेली आहेत असे नमूद करुन जेष्ठ नागरिक संघ करीत असलेल्या कार्याविषयी उपस्थितांना माहिती दिली. उपस्थितांशी संवाद साधताना श्रीमती वृषाली मगदूम यांनी गेल्या पन्नास वर्षात स्त्रियांच्या झालेल्या चळवळीचा आढावा घेतला. आज देखील स्त्रियांची प्रगती तितकीशी बदललेली नाही, आज देखील ग्रामीण भागातील कष्टकरी महिलांना समान वेतन मिळत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले तसेच फातिमा शेख या भारतीय पहिल्या महिला शिक्षकांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख करुन भंवरी देवी, बिलकिस बानू तसेच निर्भया केस यांचा आपल्या भाषणात उल्लेख केला. त्यानंतर ज्येष्ठ नागरिक संघाने विविध क्षेत्रात योगदान दिलेला महिलांचा हिरकणी पुरस्कार - २०२५ देऊन त्यांनी सत्कार केला.

हिरकणी पुरस्कार प्राध्यापिका प्रतिभा सराफ, (साहित्य) , श्रीमती मनीषा वळकुंडे, (व्यसनमुक्ती ), श्रीमती रेहान पटेल राणे , (कलाक्षेत्र) ,श्रीमती कमल आंगणे (वैद्यकीय क्षेत्र) ,श्रीमती सुवर्णा मिसाळ , (शैक्षणिक क्षेत्र ),श्रीमती बाला सिताराम रोकडे, (क्रीडा क्षेत्र) ,श्रीमती बिना भरत साळेकर, (सामाजिक कार्य) , श्रीमती रुक्मिणी जोसेफ पॉल, (स्वच्छता दूत ) श्रीमती लता शिरसाट, (पोस्ट वूमन) यांना अनुक्रमे देण्यात आला. उत्कर्ष ज्येष्ठ महिला मंडळाच्या माध्यमातून श्रीमती रेखा वाळवेकर यांनी जे अनमोल सामाजिक कार्य केले या कार्याचा उचित गौरव त्यांना ङ्गजीवन गौरव ङ्ग पुरस्कार देऊन करण्यात आला. प्रसंगी रणजीत दीक्षित यांनाही वाढदिवसाच्या निमित्ताने पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर गुमास्ते यांनी छान सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले व रसिक प्रेक्षकांचे मनोरंजन केले. श्रीमती फुलन ज्योतिराव शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महिलांच्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच आपल्या स्वानुभवावरून योगाचे महत्त्व प्रतिपादन केले. महिला दिनाच्या या कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन श्रीमती रजनी कलोसे व अजय माढेकर यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विकास साठे यांनी केले. संस्थेच्या कार्यकारिणी मंडळातील सर्व सदस्यांनी मेहनत घेऊन संपूर्ण कार्यक्रम यशस्वी केला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

---

## प्रगतीशील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्राचे नेतृत्व करावे : जिल्हाधिकारी कर्डिले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : जिल्ह्यातील ८० टक्के नागरिक शेतीवर आधारीत अर्थव्यवस्थेशी जुळले आहेत. मात्र कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, जलसंधारण, कृषी यांत्रिकीकरण सर्वच क्षेत्रात आम्हाला सुधारण्यास वाव आहे. त्यामुळे ज्यांनी सेंद्रियशेतीपासून शेतीवर आधारीत अर्थव्यवस्थेत प्रगती केली आहे त्या प्रथीतयश शेतकऱ्यांनी नांदेडच्या कृषीक्षेत्राचे नेतृत्व करावे. कृषी विभाग त्यांना पाठबळ देईल, अशा आश्वासक शब्दात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रगतीशील शेतकऱ्यांना जिल्ह्याच्या विकासात पुढे येण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हाधिकारी नांदेड, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, प्रकल्प संचालक आत्मा आणि नांदेड येथील रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान येथे १७ व १८ मार्च दोन दिवस हा महोत्सव सुरू असणार आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या कृषी, माती, शेती व यासंदर्भातील तंत्रज्ञानाला



जोडल्या गेलेल्या या कृषी महोत्सवाचे थाटात उद्घाटन झाले. यावेळी २९ वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांचा त्यांच्या हस्ते सत्कार झाला. या शेतकऱ्यांनी कृषीक्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करून अवघ्या काही गुंठे शेतामध्ये लक्षावधीचे उत्पादन घेतले आहे. या सर्व शेतकऱ्यांनी केलेले प्रयोग लोकांपर्यंत पोहोचावे व त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी बोलतांना जिल्हाधिकाऱ्यांनी काही मोजकी उदाहरणे दिली. ते म्हणाले अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये जितके दुध उत्पादन होते तेवढे उत्पादन आपल्या अनेक जिल्ह्यांचे मिळून होत नाही. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, समूहशेती, आयात-निर्यात निगडीत शेती यासंदर्भात अनेक चांगले प्रयोग जिल्ह्यात झाले पाहिजेत. त्यामुळे या दोन दिवसांमध्ये याठिकाणावरून ज्ञान घेऊन जा. त्यानंतर त्याबाबतीत प्रयोग करा. कृषीक्षेत्र प्रयोगशील लोकांना भरभरून परतफेड करणारे क्षेत्र आहे. जिल्हा कृषी व धान्य महोत्सवात उत्पादक ते ग्राहक थेट विक्री करण्यात येते. याठिकाणी स्थानिक गुळ, भाजीपाला, विविध दाळी, फळे, ऊस, ज्यूस, महिला बचतगटांचे स्टॉल, वनऔषधी, लाकडी घाणा तेल याशिवाय सेंद्रीय शेतीत पिकविण्यात आलेली गहू, ज्वारी, तूर, मुग, उडीद, हरभरा दाळ, मध, डिंक, सेंद्रिय टरबूज, खरबूज याशिवाय नित्य उपयोगी जीवनावश्यक वस्तूंचे ८२ स्टॉल्स लावण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचे असणारे हे स्टॉल विक्रीसाठी नांदेडकरांची वाट बघत असल्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## कवी उल्हास देशपांडे यांना मराठी काव्य सम्राट पुरस्कार



दैनिक साहित्य तेज तिसरा वर्धापन दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ सभागृह छत्रपती संभाजीनगर येथे कवी संमेलन व पुस्तक प्रकाशन सोहळा दिनांक १६/०३/२०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी कवी संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व लेखक श्री भारत सातपुते यांच्या हस्ते शहरातील सुप्रसिद्ध कवी व लेखक उल्हास देशपांडे यांना त्यांच्या उत्कृष्ट काव्य लेखनासाठी मराठी काव्यसम्राट पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यापूर्वी साहित्य क्षेत्रातील योगदान, तसेच उत्कृष्ट काव्य लेखनाबद्दल श्री देशपांडे यांना राष्ट्रीय काव्यरत्न पुरस्कार, मराठवाडा साहित्य भूषण पुरस्कार, साहित्यरत्न पुरस्कार, राज्य गौरव पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. या पुरस्कारामुळे कवी श्री देशपांडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्री देशपांडे हे महावितरण कंपनीचे कर्मचारी असून सामाजिक जीवन व मानवी आयुष्य यावर आपल्या कवितेतून भाष्य करत असतात.

हा कार्यक्रम सुप्रिया जाधव यांनी आयोजित केला असून या कार्यक्रमात ४० कवींनी कविता सादर केल्या. श्री उल्हास देशपांडे यांनी यावेळी आयुष्य असंच जगायचं ही सुंदर कविता सादर केली.संमेलनाला गझलकार कवी गुलाबराजा फुलमाली, पुष्पकराज गावंडे, संजय आहेर, संघर्ष साळवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःशहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १८ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# बीडच्या धनंजय नागरगोजेसारख्या आणखी किती जणांचा बळी घेणार?

बीड : खासगी शिक्षण संस्थेतील शिक्षकांची वेतनवाढ होत नाही. त्यातच संस्था चालकांच्या होणा या सततच्या त्रासामुळे बीडच्या एका शिक्षकाने फेसबुक पोस्ट करुन आपली जीवनयात्रा संपविली. या घटनेमुळे खळबळ उडाली असून सोशल मीडियावरून शासनाच्या धोरणाविरोधात निषेध व्यक्त होत आहे. डी.एड, बी.एड करून तुटपुंज्या पगारावर शिक्षक पदरमोड करून खासगी शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करत आहे. आज ना, उद्या वेतन वाढ होईल, या आशेवर गुरूजी अनुदानित माध्यमिक विद्यालयात मुलांना शिकविण्याचे प्रामाणिकपणे काम करत आहेत. कधी ना कधी तरी आपल्याला पूर्ण पगार मिळणार, या भरवशावरील गुरुजी आज आपल्या संसाराचा गाडा तोकड्या पगारावर चालवत आहेत. अल्पशा वेतनावरच दिवसेंदिवस संसाराचा गाडा चालवणा-या वेतनवाढ होत नससल्याने काही गुरूजींनी आत्महत्या तर काहींचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. अर्धावरच डाव सोडवून शिक्षक गेले तरी, सरकारकडून ठोस निर्णय होत नाही. यंदाच्या अर्थसंकल्पात काही तरी निर्णय होईल, अशी आस होती. परंतू अर्थसंकल्पात अनुदान तर नाहीच शिवाय शिक्षक वेतनवाढ संदर्भात काहीच तरतूद करण्यात आलेली नाही. अशातच बीड येथे एक धक्कादायक प्रकार घडला आहे. धनंजय नागरगोजे या शिक्षकाने फेसबुकवर पोस्ट करत संस्था चालक यांच्या त्रासास व वेतनवाढ होत नसल्याने आपली जीवनयात्रा संपविली. या प्रकारामुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. असे किती गुरुजींचे बळी घेतल्यानंतर सरकार अनुदान देऊन शंभर टक्के वेतनवाढ देणार, अशा पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. शासनाच्या या धोरणाविरोधात रोष व्यक्त केला जात आहे. मागील पंचवीस वर्षांपासून अंशतः वेतनावर वेठबिगार सारखे शिक्षक काम करत आहेत. आजवर शेकडो कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे राष्ट्रीय आणि सांस्कृतिक कार्य आजही दिपस्तंभासारखे उभे.

-माजलगाव प्रतिनिधी दिनांक १७ मार्च २०२५

राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे धगधगते जीवन असूनही देशासाठी केलेले कार्य बहुमोल आहे.अहिल्यादेवी होळकर यांचे राष्ट्रीय आणि सांस्कृतिक कार्य आजही दीपस्तंभा सारखे उभे आहे.असे प्रतिपादन प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले. ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दी वर्ष निमित्ताने इतिहास अभ्यास मंडळाने आयोजित केलेल्या व्याख्यानात श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी होते.पुढे बोलताना प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर म्हणाले की, इतिहास आपण वाचला पाहिजे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा आदर्श राज्यकारभार ,कृषीविषयक ,पाणी योजना,वृक्षसंवर्धन,उद्योग व्यवसाय,यासाठी केलेले कार्य हे महत्वाचे आहे . त्यांनी समाजातील विद्वान, पंडित यांना मनाचे स्थान दिले.भारतीय संस्कृती जपण्यासाठी मंदिरे निर्माण करण्याचे महान कार्य अहिल्याबाई होळकर यांनी भारतभर केले. सतीप्रथा नष्ट करून स्त्रियांची फलटण उभी केली. स्थापत्य कलांचा विकास करून बारव,घाट,पाणपोई, धर्मशाळा,रस्ते,अन्नछत्रे उभी केली. सामाजिक समता आणि परिवर्तन निर्माण करण्याचे कार्य स्त्री म्हणून जगभर महत्वपूर्ण आहे. असे ते म्हणाले.अध्यक्षीय समारोप प्रसंगी





प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, मराठवाडा ही संतांची आणि सुधारकांची भूमी आहे. या भूमीतील ऐतिहासिक महापुरुषामध्ये अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्रातील काही विचार आपण वेचले पाहिजेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे आधुनिक भारताच्या जडणघडणीत आणि सांस्कृतिक राष्ट्रवादात महत्वपूर्ण कार्य आहे. विद्यार्थ्यांनी थोरांमोठ्याचे चरित्र वाचून आपले ते प्रेरणास्थान केले पाहिजे असेही ते म्हणाले. प्रास्ताविक इतिहास अभ्यास मंडळ प्रमुख डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. श्रीमती प्रतिभा जाधव यांनी केले तर आभार डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी मानले .

# बोधडी येथे आरोग्य शिबिर संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : किनवट-माहूर विधानसभेतील शहर व ग्रामीण भागात नागरिकांच्या सेवेकरिता भव्य मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मा वाटप व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे यांच्या संकल्पनेतून व लोककल्याण आरोग्य केंद्र मुंबई शिवसेना, किनवट - माहूर विधानसभा, लोककल्याण बहुद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.९ मार्च ते १८ मार्च २०२५ रोजी पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. सोमवार दि.१७ मार्च रोजी विठ्ठलेश्वर मंदीर बोधडी (बु.) येथे सकाळी ९ ते ५ या वेळेत या शिबिरात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मा वाटप व आरोग्य तपासणी तसेच सर्दी, ताप, खोकला, सांधेदुखी, पोटदुखी, डोकेदुखी, रक्तदाब, रक्त शर्करा, ऐसीडीटी, नेत्र तपासणी त्याच बरोबर ज्येष्ठ नागरिकांचे विकार आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या.सदरील शिबिरामध्ये आरोग्य तपासणी व नेत्र तपासणी करून औषधे मोफत दिली. सदरील शिबिराचे उद्घाटन लोकमतचे पत्रकार सुधाकर कदम पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.शिबिरात ४०० नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.डॉ.अनिल चव्हाण डॉ.संजय यादव डॉ.कुणाल यांनी शिबिरातील रुग्णांच्या आरोग्य तपासणी केल्या. यावेळी तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील, प्रकाश बोंबले,राजू शिंदे,गणेश नामते,शिवराज नामते,गणेश बोईनवाड,अरुण दिवसे,कुंदन उडवंत,उमाकांत केंद्रे,संजय जाधव,नारायण



बोईनवाड,विष्णु जाधव, बंटी दिवसे,सोपान शिंदे आदी उपस्थित होते.

# बँकेतून रोकड काडणाऱ्यावर चोरट्यांची नजर

शहरातील तहसील कार्यालय व मोंढा येथून वाहनांच्या डिक्कीत ठेवलेले दोन जणांचे एकूण २ लाख ४० हजार रुपये अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २४ फेब्रुवारी रोजी भर दिवसा घडली. याप्रकरणी १५ मार्च रोजी परळी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अज्ञात चोरट्यांचा सीसीटीव्ही फुटेज आधारे तपास लागण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. बँकेतून पैसे काढताना त्यावर नजर ठेवून डल्ला मारणारे चोरटे हे बाहेरगावच्या चोरट्यांच्या गँगमधील असल्याचा अंदाज पोलिसांना आहे. परळी तालुक्यातील खोडवा सावरगाव येथील शेतकरी बाबुराव दहिफळे यांनी काही कामानिमित्त एका बँकेतून २ लाख रुपये २४ फेब्रुवारी रोजी काढले होते. काढलेले दोन लाख रुपये पिशवीमध्ये ठेवून चार चाकी वाहनाच्या डिक्कीत ठेवले होते. बाबुराव दहिफळे तहसील कार्यालयात काही कामानिमित्त गेले होते. त्यांच्या गाडीजवळ कोणी नव्हते हे पाहून अज्ञात चोरट्याने त्यांच्या गाडीच्या काचा फोडून व दरवाजाचे लॉक तोडून पैसे घेऊन धुम ठोकली. नागरिकांनी अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये, रोख रक्कम, सोन्याचा ऐवज याविषयी सतर्कता बाळगावी. परळी शहरातील अनेक वॉर्डामध्ये चोरीचे प्रकार घडू नये यासाठी नागरिकांची रात्रीची गस्त सुरू केली आहे. शहरात घडलेल्या चोऱ्यांचा तपास चालू आहे.

# निकीनगर सोसायटीत महिला दिन उत्साहाने साजरा.

कल्याण -आजकाल जागतिक महिला दिन हा सगळीकडेच मोठ्या उत्साहात पार पडतो . कल्याण येथे अनेक सोसायटी मध्ये ही महिलांना सन्मान देण्यात येतो.खरोखर या गोष्टींचा महिलांना हेवा वाटतो. स्त्री म्हणजे घराबाहेर जाऊन नोकरी करणारी असो किंवा घर सांभाळून मुलांना योग्य शिक्षण देऊन स्वतःची जबाबदारी पार पाडणारी स्त्री असो.या सर्व महिलांना एकत्रित करून हा सोहळा अगदी आनंदाने साजरा केला जातो.

ज्येष्ठ नागरिक संघातील ज्योती लिखिते, तिलोत्तमा विचारे तसेच अनिता मटकरी व सुधा पाटील या महिलांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम अतिशय सुंदर रित्या साजरा केला. त्या निमित्ताने खूप दिवसांनी अशा





७०/८०महिला एकत्र येऊन गप्पांच्या ओघात रमल्या.त्यामुळे कार्यक्रम जरी छोटेखानी असला तरी महिलांनी आनंद भरभरून घेतला.निकीनगर को.हौ.सोसायटीमध्ये ही महिला दिनाच्या निमित्ताने हा उत्सव साजरा करण्यात आला . यावेळी महिलांना साठी संगीत खुर्ची ही ठेवण्यात आली होती.सर्व महिलांना गुलाबाचे पुष्प आणि मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी महिला आजकाल सुरक्षित आहेत का..?यावर साहित्यिक अनिता प्रविण कळसकर यांनी महिला सबलीकरण नावाची कविता सादर केली.तसेच आजचा महिला दिवस आपण साजरा करतो ,ते आपल्या हक्कासाठी लढा देणा-या स्त्रियांना मानवंदना देण्यासाठी असे सांगितले .शिवाय महिला दिनाविषयी थोडक्यात माहिती ही दिली.असा हा आगळावेगळा कार्यक्रम प्रथमच सोसायटीत केल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक संघाचे मनःपूर्वक आभार आणि धन्यवाद ही मानले. आजचा दिवस महिलांनी भरभरून एकमेकांची स्तुती कली.

# स्वप्नांच्या पूर्ततेसाठी सातत्यपूर्वक परिश्रम आवश्यक-दंत रोग तज्ञ डॉ.अमित नेमाणे

पंढरपूर अहंकारवृत्ती आपल्या प्रगतीसाठी खूप हानिकारक असते. ही वृत्ती आज सगळीकडे पहावयास मिळते आणि त्यामुळे होणारे नुकसान खूप मोठे असते म्हणून आयुष्यात यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहावीत आणि त्यांच्या पूर्ततेसाठी सातत्याने परिश्रम करत रहावे. आयुष्यात माहिती नसलेल्या गोष्टी जेंव्हा आपण शोधण्यास सुरुवात करतो तेंव्हा त्या शोधकार्यात एकाग्रता निर्माण होते. त्यासाठी आपण जे ऐकतो आणि विचार करतो, ते अंतर्मनात साठवून ठेवतो. अशा वेळी बाह्यमनात अनेक प्रश्न सुरु होतात. त्यावेळी मात्र आपण नकळत समोरच्याकडून येणाऱ्या प्रश्नांच्या प्रतिसादाकडे पाहतो कारण जे फायद्याचे आहे ते घेतले जाते. अशावेळी मन तृप्त असते. त्यामुळे सर्व चांगले दिसते, सकारात्मक विचार येतात. पण जेंव्हा मन दुःखी असते तेंव्हा मात्र मनात नकारात्मकता अकारण येते. अशावेळी मन पॉझिटिव्ह राहण्यासाठी सायन्सचा आधार घ्यावा लागतो.फ असे प्रतिपादन पुण्यातील दंतरोग तज्ञ डॉ.अमित नेमाणे यांनी केले. गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (डिग्री) व कॉलेज ऑफ फार्मसी (डिप्लोमा) यांच्या संयुक्त विद्यमाने फार्मसी महाविद्यालयात एक दिवसीय दंतरोग तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.अमित नेमाणे मार्गदर्शन करत होते. दिपप्रज्वलनानंतर पुढे बोलताना डॉ.अमित नेमाणे म्हणाले की, अंतर्मन हे नेतृत्व ऐकते पण विचार करू शकत नाही म्हणून अंतर्मन व बाह्यमन हे जाणून घेण्यासाठी आपल्याला शांत व संयमाने समजून घ्यावे लागते.

# विधानपरिषदेची उमेदवारी न मिळाल्याने शिंदे गटाच्या शीतल म्हात्रे हिरमुसल्या





मुंबई राज्यातील विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी येत्या २७ मार्चला होत असलेल्या निवडणुकीसाठी संजय मोरे यांच्या नावांचीही चर्चा होती. इच्छुकांची भाऊगर्दी असल्याने एकनाथ शिंदे यांनी शेवटपर्यंत उमेदवाराचे नाव जाहीर करणे टाळले होते. सोमवार हा उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. अर्ज दाखल करण्यासाठी अवघे काही तास उरले असताना एकनाथ शिंदे यांच्याकडून चंद्रकांत रघुवंशी यांचे नाव जाहीर करण्यात आले. त्यामुळे विधानपरिषदेवर जाण्यासाठी इच्छूक असलेल्या शीतल म्हात्रे काहीशा नाराज झाल्या.



नाळवंडीच्या मातृभूमीत माझी जडणघडण झालेली आहे.यामातीच्या संस्कारात ऊर्जा आहे.नाळवंडीकरांचे कायम ऋणी असल्याची भावना उद्धव मेहेत्रे यांनी व्यक्त केली. नाळवंडी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब काळे यांच्या संयोजनातून ग्रामस्थांनी उद्धव मेहेत्रे यांचा सेवानिवृत्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता

# आदिवासी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी प्रशिक्षण

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : आदिवासी उमेदवारांसाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र किनवट या प्रशिक्षण केंद्रात येत्या 1-एप्रिल 2025 पासून विविध स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार आहेत.या प्रशिक्षण सत्रात नोकऱ्यांसाठी विविध स्पर्धा परिक्षांची तयारी करून घेण्यात येते.पात्र इच्छूक आदिवासी (अनुसूचित जमातीचे) उमेदवारांनी 27- मार्च 2025 पर्यंत शैक्षणिक व जातीचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावेत, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी किनवट यांनी केले आहे. या प्रशिक्षण सत्रात नौकऱ्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विविध स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेण्यात येते तसेच आदिवासी उमेदवारांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर खात्याच्या स्वयंरोजगार योजनांची माहिती देवून मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रशिक्षण केंद्रात 1-एप्रिल 2025 पासून सुरु होणाऱ्या 111 च्या प्रशिक्षण सत्रात आदिवासी सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांना विविध स्पर्धा परीक्षेची तयारीसाठी प्रवेश देण्यासाठी उमेदवारांनी 27- मार्च, 2025 तत्पुर्वी या कार्यालियास पोहचतील अशा बेताने आदिवासी (अनुसूचीत जमातीचे ) उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्यासाठी या पत्त्यावर आदिवासी उमेदवारांकरीता कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या बाजूस गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड नि कोड-431811 वर संपर्क दुरध्वनी क्रमांक 02469-221801/ 9423748008/ 7219709633 वर संपर्क करावा, असेही कळविले आहे. या प्रवेशाच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत. उमेदवार अनुसूचित जमाती पैकी (एस.टी.) प्रवर्गातील असावेत. नांदेड जिल्ह्यातील व इतर जिल्ह्यातील उमेदवारांचाही प्रवेशासाठी विचार करण्यात येइल. उमेदवार कमीत कमी शालांत परीक्षा उतीर्ण असावेत, उच्च शैक्षणिक पात्रतेस प्राधाण्य देण्यात येईल. उमेदवारांनी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, कार्यालियात नाव नोंदणी केलेली असावी. उमेदवारांनी किनवट येथे स्वत: रहाण्याची व जेवणाची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल. प्रशिक्षण कालावधी 3 महीने 15 दिवस असून शालांत परीक्षा





उतीर्ण उमेदवारांना तसेच पदवी धारकांना दरमहा 1 हजार रूपये विद्यावेतन दिले जाईल. वयोमर्यादा - उमेदवाराचे वय 27 मार्च 2025 रोजी 18 वर्ष पुर्ण असावे व 35 पेक्षा जास्त नसावे. प्रशिक्षणार्थिंचे विद्यावेतन संबंधीत प्रशिक्षणार्थिंचे बँक खात्यामध्ये दर महा जमा करण्यात येणार असल्यामूळे प्रशिक्षणार्थिंचे बँक खाते चालू असणे आवश्यक आहे. आपण यापुर्वी अशाप्रकारचे प्रशिक्षण घेतलेले असल्यास किंवा सदर प्रशिक्षण सत्र अध्यातुन सोडलेले असल्यास प्रवेश देण्यात येणार नाही असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अण्णासाहेब पाटील महामंडळाने दिले ४२४८ उद्योजकांना ३२३ कोटी चे आर्थिक पाठबळ जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर.

## महामंडळाच्या माध्यमातून तरूणाची यशस्वी उद्योजक होण्याच्या दिशेने वाटचाल

बीड दि. १७ :-अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविल्या जाणा-या छत्रपती राजाराम महाराज उद्योजकता व कौशल्य अभियान योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात ४२४८ तरुणांना ३२३ कोटी २१लाख चे कर्जवाटप झाले आहे. तसेच या नवउद्योजकांना २८ कोटी ५२ लाख रुपयेचा व्याज परतावा त्यांच्या खात्यावर जमा झाला आहे. नियमित हप्ता भरणाऱ्यांना महामंडळाकडून व्याज परतावा दिला जातो, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी दिली.

महामंडळाकडून १०६११ तरुणांना पात्रता प्रमाणपत्र मिळाले आहे. शासनाने आर्थिक दुर्बल घटकातील युवकांना स्वयंरोजगारासाठी महामंडळाच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना आणि गट कर्ज व्याज परतावा योजना राबवल्या जातात. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून कर्ज योजनेमार्फत उद्योग व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अर्थसहाय्यामुळे बीड जिल्ह-ात महामंडळाच्या माध्यमातून तरुणांना स्वप्नांना साकार करण्याचे नवे बळ मिळाले आहे. नियमित कर्जाची परतफेड करणा-यांनाही नियमित व्याज परतावा येत आहे. तरुणांनी योजनेचा लाभ घ्यावा काही अडचणी असल्यास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क करावा,असे आवाहन महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमित मालेगावकर यांनी केले आहे.





# खोक्याचे घर पाडण्यासाठी राजकीय नेत्याचा दबाव : आमदार सुरेश धस



शिरूर : सतीश भोसले ऊर्फ खोक्याचे कुटुंब मागील ३० वर्षांपासून त्या ठिकाणी राहत होते. वन विभागाने त्यांना नोटिसा बजावल्या, परंतु त्यांना त्या वाचता येत नव्हत्या. घर पाडण्यासाठी वन विभागाने अतिघाई केली आहे. या प्रकरणात कोणत्या नेत्याचा राजकीय दबाव होता, हे शोधून काढणार असल्याचे भाजपचे आमदार सुरेश धस यांनी रविवारी शिरूर तालुक्यातील झापेवाडी शिवारात सतीश भोसले यांच्या कुटुंबाची सायंकाळी भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले. दरम्यान, या कुटुंबाला राहण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याच्या सूचना आमदार धस यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. दुसरीकडे, खोक्याच्या घरासमोर चारा पेटवून महिला व मुलांना मारहाण करणाऱ्या अज्ञात २५ जणांवर शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी शिरूर येथील पंचायत समितीमधील आमसभा झाल्यानंतर सायंकाळी पाच वाजता आमदार सुरेश धस हे कार्यकर्त्यांसह सतीश भोसले यांच्या पाडलेल्या घराच्या ठिकाणी पोहोचल

बीड/महाराष्ट्र
महाराष्ट्र विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार १८ मार्च २०२५
https://lokaarambh.com


# नुतनीकरण तनिष्का व्यासपीठाचे!!



जुन्नर विभाग तनिष्का व्यासपीठाचा नूतनीकरणाचा कार्यक्रम, समूहाचे प्रमुख सन्मानीय श्री.सागर गिरमेसर यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला .

अनेक नवीन सदस्यांनी तनिष्का व्यासपीठात प्रवेश केला. याप्रसंगी सकाळ माध्यम समूहाकडून सर्व तनिष्कांना खास भेटवस्तू देण्यात आली... कार्यक्रमाचे प्रास्ताविक तनिष्का गटनेत्या सन्मानीय सौ. उज्वलाताई शेवाळे यांनी केले. प्रसंगी तनिष्का वैष्णवी चतुर, डॉ. वैशाली गायकवाड, सरिता कलढोणे, मनिषा काळे, उर्मिला थोरवे, पुष्पा बुट्टेपाटील, डॉ. कल्याणी पुंडे, उज्वला नांगरे यांनी मनोगतं व्यक्त केली...

सागर गिरमेसरांनी सगळ्यात ॲक्टीव ग्रुप असे संबोधित जुन्नर गटाचे कौतुक केले.. जुन्नरचा सर्व तनिष्कांना पुण्याला येणे शक्य होत नाही त्यासाठी जुन्नर मध्येच उपक्रम राबविणे व अधिकाधिक सामाजिक उपक्रम राबविले जातील असे आश्वासन दिले, त्याचप्रमाणे मुली व महिलांसाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने मार्गदर्शन पर व्याख्यान आयोजित करणार असल्याचे सांगितले...

ॲड.सलमा सय्यद, महानंदा हिरेमेठ, ज्योत्स्ना देशपांडे, सुविधा पांडव, रेणुका परदेशी, पुष्पा खोत, गीता खोत, दिपाली भास्कर, राधिका कोल्हे, डॉ.कल्याणी पुंडे , माया खत्री, सुजाता ढोबळे, स्मिता सोनपाटकी, रेश्मा मेहेर , हजराबी इनामदार, जयश्री जोशी, मृणालिनी गारगुंड, छाया वाळुंज, कविता साखला, माधुरी म्हसकर, प्रतिभा कबाडी , मनीषा तिवारी, तृप्ती फल्ले, अंजली दिवेकर, अफसाना इनाम दार, वनमाला लोणकर, कविता छाजेड, आशा केदारी,भारती शेटे, ज्योती मेहेर, सुवर्णा वाव्हळ, कांचन बुट्टेपाटील,भक्ती जाधव, परवीन मोमीन, जोत्स्ना वेदपाठक, मनीषा लोखंडे, प्रमिला कासार, सुवर्णा मेहेर , संगीता बारवे, सारिका वऱ्हाडी, स्नेहा साळवे, कांचन वाडकर, अनिता कबाडी, सस्मिशी भांगे, संध्या चिखले, माधुरी नांगरे, नयना आर्वीकर, अनिता काजळे, अर्चना नानावटी या महिलांनी तनिष्का व्यासपीठाचे सदस्यत्व स्विकारले...

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम तांबे तर आभार प्रतिभा केदारी यांनी मानले...

# वाल्मीकि कराड यांच्या मर्जीतील पोलीस जिल्ह्यातच ठाण माडून-तृप्ती देसाई

## सरपंच देशमुख हत्या प्रकरणः पोलिस अधीक्षक कार्यालयात सादर केली नावांची यादी, एक पॅन ड्राईव्ह!

बीड । प्रतिनिधी बीड जिल्ह्यात सरपंच देशमुख यांच्या निर्घृण हत्येने मोठी खळबळ उडाली असताना, या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड यांच्या मर्जीतील पोलीस अधिकारी बीड पोलीस दलात कार्यरत असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर, बीड पोलीस अधीक्षकांनी त्यांना पुरावे सादर करण्यासाठी आज पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावले होते तृप्ती देसाई यांनी नावांची लिस्ट व एक पेन ड्राईव्ह दिल्याची माहिती मिळत आहे. तृप्ती देसाई पोलीस अधीक्षक कार्यालयात



२६ पोलीस अधिकाऱ्यांची यादी घेऊन दाखल झाल्या. मात्र, तपास अधिकारी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांची त्यांच्याशी भेट होऊ शकली नाही. महत्त्वाच्या प्रकरणाच्या तपासासाठी त्यांना तत्काळ बाहेर जावे लागल्याचे सांगण्यात आले. मात्र, या परिस्थितीमुळे तृप्ती देसाई संतापल्या आणि त्यांनी थेट पोलिसांवरच पक्षपातीपणाचा आरोप केला आहे.

तृप्ती देसाई यांनी सादर केलेल्या यादीत सचिन पांडकर यांचेही नाव असल्याचा दावा केला जात आहे. बीड जिल्ह्यात गु ंडशाही वाढली असून, वाल्मीक कराड याच्या संबंधातील पोलिस अधिकाऱ्यांची यादी घेण्यास प्रशासन टाळाटाळ करत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यात पोलीस दल आणि गुन्हेगारी सांठगांठीबाबत नवा वाद निर्माण झाला असून, आता या आरोपांवर पोलीस प्रशासन काय भूमिका घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यात सरपंच देशमुख यांच्या निघृ ृण हत्येने मोठी खळबळ उडाली असतानाच, या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याच्या मर्जीतील पोलीस अधिकारी बीड पोलीसदलात कार्यरत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.या पार्श्वभूमीवर, बीडच्या पोलीस अधीक्षकांनी तृप्ती देसाई यांना पुरावे सादर करण्यासाठी बोलावले होते. देसाई यांनी पोलिसांना संशयित अधिकाऱ्यांची नावे असलेली यादी आणि एक पेन ड्राईव्ह सादर केल्याची माहिती मिळत आहे.या प्रकरणी पोलिसांची पुढील भूमिका काय असेल आणि यामधील आरोपांची सखोल चौकशी होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या हस्ते संजय कुंबेफळकर यांना उद्योग- भूषण पुरस्काराने सन्मानित


बीड : (प्रतिनिधी) बीड येथील ब्रेन केअर हॉस्पीटल , संकल्प व्यसनमुक्ती व पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक संजय कुंबेफळकर यांना नुकताच दिला जाणारा महाराष्ट्र उद्योग - भूषण पुरस्कार १६ मार्च २०२५ रोजी पुणे येथे प्रसिद्ध सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी याच्या हस्ते सन्मानित करण्यात आले यावेळे प्रसिद्ध अभिनेते अली खान तसेच संगीतकार दिलिप सेन याची प्रमुख उपस्थिती होती .व्यसनमुक्ती काळाची गरज असून समाजामध्ये परिवर्तन व जनजागृती करण्यांची आवश्यकता आहे .व्यसन हा एक मानसिक आजार असून ज्यामुळे अनेकांचे संसार उद्धवस्त झाले .व्यसनाधीन व्यक्ती त्याच्या परिवारासोबत समाजावर सुद्धा



ओझं बनून जाते . गेल्या अनेक वर्षांपासून व्यसन मुक्त समाज निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून त्यांनी हजारो व्यसनी लोकांना व्यसनातून मुक्त केले आहे. आपल्या कार्यातून व्यसनमुक्त महाराष्ट्र.... सक्षम महाराष्ट्र या प्रेरणेने प्रेरित होवून व्यवसनाने त्रस्त असलेल्या व समाजाने दुर्लक्षित केलेल्या व्यक्तीना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेला प्रयत्न आणि समाजाशी असलेली नाळ कायम ठेवत सामाजिक बांधिलकी जपणा-या संजय कुंबेफळकर यांच्या कार्याची दखल घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान व्यक्तींचा त्यांच्या कार्यक्षेत्रात दिलेल्या बहुमुल्य योगदानाबद्दल तसेच कर्तृत्वाबद्दल त्यांना पुणे येथे सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी बीड जिल्हात व संपुर्ण महाराष्ट्र राज्यात व्यसनाधिन लोकांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी आपली महत्वाची भूमिका बजावत असून अशा कर्तुत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यांच्या दृष्टिकोनातून समाजासाठी खुप मोठे योगदान दिले आहे . ब्रेन केअर हॉस्पिटल व संकल्प व्यसनमुक्ती केंद्राचे सर्वेसर्वा बीड येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ . मुजाहेद सर याच्या नियोजनाखाली व्यसनमुक्ती केद्रात सदरील व्यक्ती उपचार घेत आहेत. पुरस्कार मिळाल्या बदल डॉ . मुजाहेद सर यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या तसेच व्यसनमुक्ती केंद्राच्या सम न्वयक सौ. रेखा कुंबेफळकर मॅडम, नर्मदा गायकवाड मॅडम, मनिषा पवार मॅडम, छाया लाड, अनिता शिंद,आरिफ शेख, सरफराज शेख, प्रताप हातागळे, राम मस्के , अनंत जोशी, कालीदास मस्के, ईश्वर निर्मळ अभिनंदन केले.

# महाराष्ट्रभूषण अशोक हांडेना गिरणा गौरवचा जीवनगौरव

नाशिक प्रतिनिधी साहेबराव नंदन याजकडून चौरंग या संस्थेच्या माध्यम तून लोककला आणि नाट्यकलेला प्रोत्साहन देणारे ज्येष्ठ रंगकर्मी अशोक हांडे यांना गिरणा गौरव प्रतिष्ठानचा यंदाचा मानाचा मजीवन गौरवपुरस्कार जाहीर झाला आहे. पुरस्कार वितरण सोहळा ५ एप्रिल रोजी नाशिकच्या महाकवी कालिदास कलामंदिरात सायंकाळी ५ वाजता होणार आहे. रक्कम रुपये एकवीस हजार, स्मृतिचिन्ह, मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराची घोषणा निवड समितीने काल केली. उत्तर महाराष्ट्राचा मानाचा स्तंभ म्हणून सातासमुद्रापार ओळख निर्माण करणारी खान्देशची जीवनवाहिनी असलेल्या गिरणा या नदीच्या नावाने गेल्या २५ वर्षांपासून महाराष्ट्रामधील विविध क्षेत्रात



योगदान देणा-या मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने दर पाच वर्षांनी सन्मानीत करण्यात येते. २५ वर्षातला हा पाचवा जीवन गौरव पुरस्कार अशोक हांडे यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला. मराठी गायक, पटकथाकार, लेखक, दिग्दर्शक, नाटककार, लोककला आणि नाट्यकलेला त्यांनी प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम हांडे यांनी केले आहे. मराठीबाणा, आवाज की दुनीया, आझादी ५०, माणिकमोती, मंगलगाणी दंगलगाणी, गाणे सुहाने, म धुबाला आदी कार्यक्रम त्यांचे लोकप्रिय ठरले आहेत. म्हणूनच अशोक हांडे यांना जीवनगौरव प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती माजी आ.नानासाहेब बोरस्ते, ॲड.मिलिंद चिंधडे, प्रा.डॉ. लक्ष्मण महाडिक, डॉ.एस.के.पाटील, तुकाराम ढिकले, अशोक पाटील यांनी दिली.

# खोक्या भाईचा तुरुंगात अन्नत्याग आंदोलन!

बीड : मारहाण आणि प्राण्याची शिकार प्रकरणात अटकेत असलेला भाजपचे आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता सतीश भोसले उर्फ खोक्या भाई याला २० मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.पोलीस कोठडीत खोक्या भाईने अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. खोक्याने तसे पत्र पोलिसांना दिले आहे. आता प्रशासनावर दबाव वाढला आहे. अमानुष मारहाण प्रकरणात पोलीस



कोठडीत असलेल्या सतीश भोसलेने आता अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. सतीश भोसले याच्या कुटुंबाला मारहाण प्रकरणात गुन्हा दाखल झालेला आहे. याबरोबरच त्याच्या घराच्या साहित्याला देखील आग लावण्यात आली होती. या प्रकरणातील आरोपींना अटक करावी या मागणीसाठी सतीश भोसलेने पोलीस कोठडीत अन्न त्याग आंदोलन सुरू केले

# रेनबो इंटरनॅशनल स्कूलचे क्रीडाशिक्षक निखिल जाधव यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी श्रीलंका येथे निवड साने संगीत लोक कला मंच यांच्यावतीने जाहीर सन्मान.

... उरुळी कांचन रेनबो इंटरनॅशनल स्कूल चे क्रीडा शिक्षक निखिल जाधव यांची राऊल केला (ओडिसा) येथील बिरसा मुंडा अथ लेटिक स्टेडियम येथे नॅशनल मास्टर गेम्स ऑफ इंडिया यांच्या वतीने नुकत्याच आयोजित केलेल्या ७ व्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये

भालाफेक या खेळात प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक मिळवले तसेच थाळी फेक या खेळात द्वितीय क्रमांक रोपे पदक मिळवले निखिल जाधव यांनी मिळवलेल्या या यशामुळे त्यांचे श्रीलंका या देशात होणा-या पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली त्यांनी जागतिक स्पर्धेतील १०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक विजेती दुतीचंद या महान खेळाडूच्या हस्ते पदक व प्रमाणपत्र सन्मान करण्यात आले असे आदर्श व्यक्तिमत्त्व निखिल जाधव यांना पुढील वाटचालीसाठी उरळी कांचन येथील साने संगीत जनजागृती लोककला मंच उरळी कांचन अध्यक्ष(सचिव) शिवराज ज्ञानोबा साने त्यांच्या वतीने जाहीर सत्कार ठेवण्यात आला कार्यक्रम ाचे अध्यक्ष रेनबो स्कूलचे प्राचार्य प्रशांत लवहारे उपस्थिती होते तसेच अरुण खरात दत्ता साळुंखे शाहीर महेश कोळपे आसिफ शेख केसरीचे पत्रकार अमोल भोसले पालक वर्ग साने संगीत लोककला मंच उपस्थिती विद्यार्थ्यांनी स्वागत गीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा जनजागृतीच्या माध्यमातून अनेक विषयावर गीत गायन सादरीकरण केले आणि निखिल जाधव सर यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे



प्रमुख अध्यक्षाच्या हस्ते साने संगीत कला मंचाच्या विद्यार्थ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहदेव खंडागळे यांनी केले कार्यक्रम आयोजन प्रस्ताविक शिवराज साने केले कार्यक्रमाचे आभार सुनील तुपे यांनी केले

# जगतापवाडी शाळेत मुलांच्या कलागुणांचे प्रदर्शन

## विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



ता. १४ पुणे प्रतिनिधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी( शिंदेवाडी) येथे विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ आणि शिक्षक यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. पालक व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचा कलाविष्कार पाहून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करत बक्षिसांची बरसात केली.जगतापवाडी( शिंदेवाडी) येथे विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. या कार्यक्रमात एकूण २२ गाण्यांची मेजवानी रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळाली. सर्वप्रथम म ान्यवरांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून शिवरायांच्या आरतीने कार्यक्रम ाची सुरुवात झाली. यात शिवकन्या, आम्ही जातीचे शेतकरी, मला आमदार झाल्यासारखं वाटतंय, फुलपाखरू, गुलाबी साडी, आणि झुलवा पाळणा यांसारख्या बहरदार गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. शेवटी सर्वांना स्नेहभोजन देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.याप्रसंगी कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषआप्पा जगताप उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिंदेवाडी गावचे सरपंच संदीपनाना जगताप, कानिफनाथ सोसायटीचे चेअरमन नवनाथ जगताप, शिंदेवाडीचे माजी उपसरपंच मोहन शिंदे, वाबळेवाडी शाळेतील साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर, संदीप गायकवाड, केंद्रप्रमुख भालचिम साहेब, हनुमंत वाळुंज, रवी कोहिनकर, संतोष विधाटे, विजय गोडसे आदी मान्यवर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अभिजीत जगताप, माजी उपसरपंच मोहन शिंदे ,रमेश देवकर, चेअरमन नवनाथ जगताप, सागर देवकर, अक्षय जगताप, आप्पासाहेब जगताप, राजेंद्र भोसले, माजी अध्यक्ष राहुल जगताप, सत्यवान जगताप, अनिल जगताप,सागर जगताप, गणेश मेमाणे, शरद जगताप, घनश्याम जगताप,नितीन शिंदे, दीपक शिंदे ,सिद्धार्थ शिंदे, रमेश देवकर सत्यवान जगताप, शरद जगताप, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गायकवाड यांनी केले. मुख्याध्यापिका मधुबाला वेताळ यांनी प्रास्ताविक केले, उपक्रमशील शिक्षिका व औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका मीना म्हसे यांनी स्वागत तर उपशिक्षक काशिनाथ डफळ यांनी आभार मानले.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com